# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/३-९५/२०२१ दिनांक - ६.४. २०२१

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......**

संदर्भ - १) महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.DMU/2020/CR.92,DisM-1, दि.४.४.२०२०.

२) शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि-१/५७७३, दि.५.४.२०२१

३) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२७/कलि/गृहविभाग/कावि-४२३/२०२०, दि.५.४.२०२१

उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने दि.३० एप्रिल, २०२१ पर्यंत कोवीड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी नियमावली विहीत केलेली आहे. त्यानुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग तसेच मॉडेल डिग्री कॉलेज दि.३०.एप्रिल, २०२१ पर्यंत बंद राहतील.

उपरोक्त आदेश लक्षात घेता विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजासंदर्भात खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१) विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता विभागातील कर्मचाऱ्यांच्या ५० टक्के संख्या ग्राह्य धरुन आळीपाळीने विभागातील कर्मचाऱ्यांना बोलवावे.

२) शुक्रवार रात्री ८.०० ते सोमवार स.७.०० पर्यंत जमावबंदी असल्यामुळे दि.१७.४.२०२१ रोजी विद्यापीठाचे शैक्षणिक व प्रशासकीय विभाग बंद राहतील.

३) नियंत्रण अधिकारी यांनी दररोज आळीपाळीने विभागात कामाकरीता बोलाविण्यात येणार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी उपकुलसचिव (आस्था.) यांना न चुकता सादर करावी.

४) अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, उद्यान विभाग व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

उपरोक्त संदर्भ क्र.०१ च्या आदेशाची प्रत ह्या परिपत्रकासोबत जोडलेली असून त्यामधील निर्देशांचे सर्व संबंधितांनी तंतोतंत पालन करावे.

आदेशान्वये-

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

३) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अमरावती

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

२) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.

३) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

४) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

५) प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सहपत्रासह विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

2/Data2/2021/PWR/Korder.pmd(8)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प अमरावती ४४४ ६०२
(गृह विभाग)
☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in

क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- ४२३/२०२० दिनांक :05 /०४/२०२१

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक कोरोना/२०२०/प्र.क्र.५८ आरोग्य५ दि. १३/०३/२०२०
४.महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक कोरोना/२०२०/प्र.क्र.५८ आरोग्य५ दि. १४/०३/२०२०
५. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ३०/०९/२०२०, दिनांक १४/१०/२०२०, दिनांक २९/१०/२०२०, दिनांक २७/११/२०२०, दिनांक २९/१२/२०२०, दिनांक २९/०१/२०२१, दिनांक २४/०२/२०२१, दिनांक १५/०३/२०२१, दिनांक १८/०३/२०२१,
६. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २७/०३/२०२१
७. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२४५/२०२१ दि. २८०३/२०२१
८. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ०४/०४/२०२१
९. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२४१/२०२१ दि. २६/०३/२०२१

## आदेश

ज्या अर्थी कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रार्दुभाव झपाटयाने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन (Break The Chain) ची घोषणा केलेली असून "(Break The Chain)" अंतर्गत संदर्भिय क्र. ८ अन्वये अधिसूचना जारी केलेली आहे.

त्या अर्थी संदर्भिय आदेश क्र. ८ अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेतील अन्वये लागू करण्यात आलेले आदेश पूर्णत: **अमरावती जिल्हयात दिनांक ३० एप्रील २०२१ पावेतो लागू करण्यात येत आहेत.**

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास या आदेशाव्दारे पुढील आदेशापर्यंत प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरचे आदेश हे दिनांक ०५/०४/२०२१ चे रात्री ०८.०० वा. पासून ते दिनांक ३०/०४/२०२१ चे २३.५९ वा. पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती करावी व स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रसिध्दी देऊन कार्यवाही करावी.

सहपत्र :- संदर्भिय क्र. ८ च्या अधिसूचना

जिल्हा दंडाधिकारी अमरावती सत्यमेव जयते

5/4
(शैलेश नवाल)
जिल्हादंडाधिकारी अमरावती

**प्रतिलिपी:-**
१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त (शहर) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. मा. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
७. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
८. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
९. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१०. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
११. उपविभागीय दंडाधिकारी ————————(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१२. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ————————(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१३. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ————————(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१४. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्ह्यामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१५. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१६. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१७. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१८. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
१९. संबंधित सर्व विभाग ————————यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

(S)

जिल्हादंडाधिकारी अमरावती

जिल्हा दंडाधिकारी अमरावती

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 4th April, 2021**

**ORDER**

---

**Reference:**

1. The Epidemic Diseases Act, 1897.
2. The Disaster Management Act, 2005
3. Revenue and Forest. Disaster Management, Relief and Rehabilitation Department Order No. DMU-2020/C.R.92/DMU-I, dated 2nd May 2020. 3rd May 2020. 5th May 2020, 11th May 2020, 15th May 2020, 17th May 2020, 19th May 2020. 21st May 2020, 31 May 2020, 4th June 2020, 25th June 2020, 29th June 2020. 6th July 2020. 7th July 2020, 29th July 2020, 4th August 2020, 19th August 2020, 31st August 2020. 30th September. 2020 and 14th October 2020, 23rd October, 2020, 29th October. 2020. 3rd November, 2020, 14th November, 2020, 23rd November, 2020, 27th November, 2020, 27th November, 2020, 21st December, 2020, 24th December, 2020, 29th December, 2020, 14th January, 2021, 19th January, 2021, 29th January, 2021, 24th February, 2021, 15th March, 2021 and 27th March, 2021
4. Ministry of Home Affairs (MHA) Order No. 40-3/2020-PM-1(A) Dated 1st May 2020, 11th May 2020, 17th May 2020, 20th May 2020, 30th May 2020, 29th June 2020, 29th July 2020, 29th August 2020, 30th September 2020 and 27th October 2020, 25th November, 2020, 28th December, 2020, 27th January, 2021 and 23rd February, 2021

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee has issued an Order dated 30th September, 2020 and 14th October, 2020 (extended by order dated 29th October, 2020, 27th November, 2020, 29th December, 2020 and 29th January, 2021 and 24th February, 202, 15th March, 2021, 17th March, 2021 and 27th March, 2021) for containment of COVID 19 in the State for the period upto 30th April, 2021 and issued revised guidelines by including certain activities from time to time vide above mentioned orders.

Whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra is threatened with the spread of COVID-19 virus, and therefore to take certain emergency measures to prevent and contain the spread of virus, the Government in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions of The

Disaster Management Act, 2005, it is expedient to enforce the following measures throughout the State till 30th April, 2021.

Now, therefore, in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897 and the powers, conferred under The Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, hereby issues the following directions –

**1. Imposition of Section 144 and Night Curfew**

a) Section 144 to be imposed in the State.

b) From 7 AM to 8 PM on Monday to Friday, no more than 5 people to move together or gather in any public place.

c) Rest of the period (i.e. From 8 PM to 7 AM on weekdays and from 8 PM Friday to 7 AM Monday) no one to move in public place without valid reasons or by permission contained herein below.

d) Medical and other essential services are exempted and their movements or operations are to be unrestricted.

e) **Essential Services to include the following -**

a. Hospitals, diagnostic centers, Clinics, Medical insurance offices, Pharmacies, Pharmaceutical companies, other medical and health services.

b. Groceries, Vegetables Shops, dairies, bakeries, confectionaries, food shops.

c. Public Transport - Trains, Taxis, Autos and public buses.

d. Services related to functioning of offices of Diplomats of various countries

e. Pre Monsoon Activities by local authorities

f. All Public Services by local authorities.

g. Transport of Goods

h. Agriculture related services

i. E-Commerce

j. Accredited Media

k. Services designated as essential services by local disaster management authority

2. **Outdoor Activity**

a) All beaches/ gardens/ public grounds to remain closed from 8 PM to 7 AM on weekdays and from 8 PM Friday to 7 AM Monday.

b) Between 7 AM to 8 PM on Monday to Friday, visitors to follow strictly Covid Appropriate Behaviour.

c) Local authorities to ensure that such places are closely supervised and in case of crowding occurring in such locations to a point where the local authorities feel that it behaviour of visitors is not disciplined and may lead to transmission/ spread of the COVID-19 virus, then they may close down the same.

3. **Shops, Markets and Malls**

All shops, markets and malls to remain closed throughout the day except for essential services.

a. Essential services shops to operate while ensuring social distancing between customers in the shop premises. Extra customers to be kept waiting with adequate social distancing with markings wherever possible.

b. Essential shops owners and person working at all shops to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI. All shops are advised to follow safety measures like interaction with customers through a transparent glass or other material shields, electronic payment etc.

c. All shop owners that are closed for now are advised to get all persons working with them to get vaccinated as per criteria of GOI as well as prepare with measures like like interaction with customers through a transparent glass or other material shields, electronic payment etc. so that government can expedite reopening of the same without fear of spread.

**4. Public Transport:**

Public transport will be fully operational with following restrictions:

| | |
|---|---|
| Auto Rickshaw | Driver + 2 passengers only |
| Taxi (4 wheelers) | Driver + 50% vehicle capacity as per RTO |
| Bus | Full seating occupancy as per RTO passing. However, no standing passengers will be allowed. |

a) All persons using public transport to compulsorily wear mask in a proper manner barring which fine of Rs 500 will be imposed on the offenders.

b) In 4 wheeler taxi, if any one person is not wearing mask, the offender and the driver of the taxi will be fined an amount of Rs 500 each.

c) All vehicles to be sanitized after every trip.

d) All public transport - drivers and other staff coming into contact with the public to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI and till vaccinated completely to carry negative corona result certificate valid upto 15 days. This rule will come into effect from 10th April, 2021. For taxis and autos, however, if driver isolates himself or herself through a plastic sheet or otherwise he or she may be exempted from this requirement.

e) In case if any of the above are found to be without negative RTPCR Certificate/ without being vaccinated as above, a fine of Rs 1000/- will be levied.

f) In the case of out-station trains, railway authorities to ensure that there are no standing passengers in the general compartment and all passengers use masks.

g) Fine of Rs 500 to be levied in all trains for non use of masks.

**5. Offices:**

a) All Private offices to remain closed except for the following:

   a. Cooperative, PSU and Private Banks

   b. BSE/ NSE

   c. Electric Supply related Companies

   d. Telecom Service Providers

   e. Insurance/ Mediclaim Companies

   f. Pharmaceutical company offices needed for management of production/ distribution

b) Local disaster management authorities may add exceptions if needed

b) Government offices to function with 50% attendance except those required for the response to Covid 19 pandemic wherein they will work with 100% strength as per the decision of the HOD of the department/ office.

c) All government offices as well as government companies related to electricity, water and banking and other financial services shall remain functional with full capacity.

d) In case of Government offices as well as government companies, all meetings with anyone apart from office staff which is present in the same campus must only be conducted online.

e) No visitors to be allowed in Government offices as well as government companies. Offices to start e-visitor system at the earliest.

f) For government offices, in case of an exceptional circumstance, the HOD may be allowed to issue pass for visitors subject to them having a negative RTPCR report of within 48 hours on entry into the office.

g) For both private and government offices, to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI, so that government may reopen expeditiously offices without fear of spread or acceleration of Covid 19.

**6. Private Transport**

Private Vehicles including private buses can ply normally from 7 AM to 8 PM on Monday to Friday and for the purposes of emergency or essential services for rest of the period (8PM to 7 AM on weekdays and 8PM on Friday to 7AM on Monday).

Private buses, in addition will be subjected to following:

   a. To ply with only seating capacity. There should be no standing passengers ever.

   b. Staff must get vaccinated at per GOI criteria and till vaccinated, all the staff must have a valid negative RT-PCR test result certificate valid till 15 days. This rule shall operate from 10th April 2021.

## 7. Recreation and Entertainment

a) Cinema halls to remain closed.

b) Drama theatres and auditoriums to remain closed.

c) Amusement Parks/ Arcades/ Video Game Parlours to remain closed.

d) Water Parks to remain closed

e) Clubs, Swimming Pools, Gyms and Sports Complexes to remain closed.

f) All persons connected with these establishments should get vaccinated at the earliest, as per GOI guidelines so that reopening of these may be achieved at the earliest without fear of spread or acceleration of Covid 19.

g) Shooting for Films/ Serials/ Advertisement to be allowed subject to

  a. Generally shooting of scenes with large number of artists to be avoided.

  b. All staff engaged as well as artists to carry negative RT-PCR test certificate valid for 15 days. This order will operate from 10th April, 2021.

  c. In case a Quarantine Bubble maybe created for the artists and staff engaged, they may be allowed by concerned disaster management authority with any number provided before entry into the bubble negative RTPCR test has been conducted on each one.

## 8. Restaurants, Bars, Hotels

a) All Restaurants and bars to remain closed, except for those inside the campus and integral parts of hotels.

b) Take away orders, parcels and home delivery services to be allowed between 7 AM to 8 PM from Monday to Friday. On weekends only home delivery services shall be allowed between 7 AM to 8 PM and there shall be no visiting any restaurant or bar for ordering purposes or pickup.

c) Restaurants and bars inside hotels are to be open only for in-house guests. In no circumstance should outside guests be allowed. For outsiders, they will follow the same restrictions as any other restaurant and bar as mentioned above.

d) All personnel belonging to home delivery services to be vaccinated at the earliest as per GOI guidelines. However, in case the person is not vaccinated, he will have to carry a

negative RTPCR report which will be valid till 15 days. This rule will be applicable from 10th April, 2021.

e) Without negative RTPCR Certificate/ without being vaccinated as above, post 10th April 2021 a fine of Rs 1000/- will be levied on the offender and fine of Rs 10,000 will be levied on the establishment. Repeated offenders may be withdrawn licenses or permissions for operations till notification for COVID 19 epidemic remains in force.

f) All staff that may work in these restaurants and bars are advised to get vaccinated at the earliest, as per GOI guidelines, so that reopening of these may be expedited.

**9. Religious Places of Worship**

a) Religious Places of Worship to remain closed.

b) All the personnel engaged in the service of the place of workshop shall continue to perform their duties though no outside visitor shall be allowed.

c) All staff that may work in these places are advised to get vaccinated at the earliest, as per GOI guidelines, so that reopening of these may be expedited.

**10. Barber Shops/ Spa/ Salon/ Beauty Parlors**

a) Barber shops/ Spa's / Salons and Beauty Parlors to remain closed.

b) All staff that may work in these establishments are advised to get vaccinated at the earliest, as per GOI guidelines, so that reopening of these may be expedited.

**11. Newspapers:**

a) Newspapers can be printed and circulated.

b) Home Delivery also to be allowed between 7AM to 8 PM on all days.

c) All persons engaged in the activity to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI. All home delivery persons to carry negative RTPCR test result certificate, which will be valid for 15 days. This rule will come into effect from 10th April, 2021.

**12. Schools and colleges:**

a) Schools and Colleges to remain closed.

b) Rule is hereby relaxed for std 10th and 12th students to the extent of exams. All the staff that may be used for conduct of exams must be either vaccinated or should carry a negative RT-PCR certificate, valid for 48 hours.

c) For exams that are being conducted by any board, university or authority outside the state, denial of which may lead to hardships for students residing in Maharashtra may be allowed by concerned department under intimation to concern disaster management authority.

d) All private coaching classes of any kind to remain closed.

e) All staff that may work in these establishments are advised to get vaccinated at the earliest, as per GOI guidlines, so that reopening of these may be expedited.

**13. Religious, Social, Political, Cultural Functions**

a) No religious, social, cultural or political functions of any kind to be allowed.

b) In case of districts where elections are scheduled to be held, the permission may be granted by the District Collector for any political gatherings subject to the following conditions-

a. Permission may be granted for any political gathering for the purpose of campaigning within the guidelines of the Election Commission of India subject to no more than 50 people or 50% occupancy whichever is less being allowed in any enclosed space and not more than 200 people or 50% of the capacity be allowed in open spaces subject to complete adherence to all laid down COVID 19 protocols

b. There should be personnel deputed by the Collector for overseeing any such event to ensure scrupulous adherence to all protocols.

c. In case of violation of the said protocols, the owner of the premises should be held accountable and may be penalised under the Disaster Management Act, 2005. Incase of serious breaches, the space may be sealed until the end of the pandemic.

d. Incase of more than 2 such violations in gatherings of any candidate, no further permissions for holding any political gatherings be granted by the Collector to the said Collector.

e. For any other event like rallies, corner meetings etc, all COVID 19 protocols must be adhered to.

f. All guidelines must be applied equally without fear or favour to all participants in the election process and there should be no room for any grievance arising from selective or partisan application of the said guidelines.

c) Marriages will be allowed with maximum of 50 people present.

a. All the staff at any marriage hall or at any location serving visitors have to be vaccinated and till completely vaccinated they have to carry a valid negative RT-PCR certificate.

b. In case if any of the above are found to be without negative RTPCR Certificate/ without being vaccinated as above, a fine of Rs 1000/- will be levied on the offender and fine of Rs 10,000 will be levied on the establishment.

c. Repeated offence in respect of a premise would lead to sealing of the same and withdrawal of permission to conduct any gathering therein till operation of notification of Covid 19 epidemic.

d) Funerals to be allowed a maximum of 20 people. All the staff should get vaccinated at the earliest and should carry a valid negative RT-PCR certificate.

**14. Roadside Eatable Vendors:**

a) There will be no serving of food for eating at the location - parcels or home deliveries are allowed from 7 AM to 8 PM on every day.

b) Waiting customers to wait away from counter with adequate social distancing.

c) Violation would lead to shutting down of the vendor till end of pandemic.

d) every one engaged in the activity to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI. Till vaccination, these have to carry a negative RT-PCR test result valid for 15 days. This order shall take effect from 10th April, 2021. If local authority feels that there is discipline in behaviour of the vendors, it may extend the effect of this order beyond 10th April 2021.

e) Local authority to have a close watch over such places through deployment of adequate personnel/ CCTV. Any customers or the vendors engaging in irresponsible behaviour violating COVID 19 protocols to be fined.

f) However if the local authority feels that such behaviour is repetitive and is not possible to contain with the imposition of fines, then they may order closure of the location either temporarily or till the end of the pandemic

**15. Manufacturing Sector**

a) To be operational with following conditions –

b) Factories and manufacturing units to scan body temperature of labourers pre- entry.

c) All staff - managerial as well as shop floor and others - without exception - every one engaged in the activity to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI

d) If a labourers/ worker found positive, other laborers who have come into active contact with him to be quarantined with pay.

e) Factories/ Units with more than 500 workers to set up their own quarantine facilities.

f) In case of any worker found to be positive, unit to be closed until completely sanitised.

g) Lunch and tea breaks to be staggered for avoiding crowding. No common eating places

h) Common toilet facilities to be sanitised frequently.

i) All workers to get vaccinated as per GOI criteria and till vaccinated to carry a valid negative RTPCR test result certificate, which will be valid for 15 days. This rule will come into effect from 10th April, 2021.

j) If a worker is found positive he or she would be allowed medical leave and cannot be discontinued during this absence for this reason. He or she will be entitled for full wages that he or she might have earned had he or she not contacted corona.

**16. Oxygen Producers -**

A) Any industrial process that is a net consumer of oxygen as a raw material is to be disallowed by default from 10th April 2021 onwards. Anyone desirous of carrying out such a process should approach the licensing authority and specifically ask for permission to continue by explaining the reasons. All licensing authorities should ensure that concerned establishments either stop the process by 10th April 2021 or obtain explicit permission to continue.

B) All industrial producers of oxygen shall reserve 80% of their production (actual as well as capacity) for medical or pharmaceutical purposes. They should declare their customers and end use of the oxygen supplied from 10th April 2021 onwards.

**17. E- Commerce**

a) Every one engaged in the activity to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI and till vaccinated should carry a negative RT-PCR certificate that will remain valid for 15 days. The said rule will come into effect from 10th April, 2021.

b) Repeated offence may lead to withdrawal of license to operate till the end of notification of COVID 19 epidemic.

**18. Cooperative Housing Societies**

a) Any Cooperative Housing Society having more than 5 active Corona positive cases will be treated as a micro containment zone.

b) Such societies shall put up a board at the outside gate informing visitors and deny them entry.

c) All restrictions of micro-containment zones like control over ingress and egress shall be monitored by the society.

d) In case of default the society maybe fined 10000/- in the first instance. Later instances may attract higher fines as decided by local authorities. This fine may be used to employ supervising personnel to ensure compliance of SOP by the society.

e) All CHS's are advised to ensure that all persons coming into the building on a regular basis get their RTPCR test done till they are vaccinated as per Government norms.

**19. Construction Activity**

a) To be allowed only for sites where labourer's are living on site. Movement to and fro from outside must be avoided, except for the purposed of material movements.

b) Every one engaged in the activity to get vaccinated at the earliest, as per criteria of GOI and till get vaccinated must carry a negative RTPCR test result certificate, which will be valid for 15 days. This rule will come into effect from 10th April, 2021.

c) Defaults will lead to a fine of 10000/- for the developer of the construction site and repeated defaults may lead to closure of the site till existence of notification of COVID 19 epidemic.

d) If a worker is found positive he or she would be allowed medical leave and cannot be discontinued during this absence for this reason. He or she will be entitled for full wages that he or she might have earned had he or she not contacted corona

**20. Penalties**

a) All penalties as per Government orders dated 27th March, 2021 will be in force aligned with the penalties as mentioned in the current order.

b) All the fines so collected shall move to the concerned disaster management authority for utilization of the same towards better containment and treatment of Covid 19 disaster.

**The said order will come into force from 8 PM on Monday, 5th April 2021 from 8 PM and will remain in force till 11.59 PM on 30th April, 2021**

BY ORDER OF AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHRTA

(SITATAM KUNTE)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

जिल्हादंडाधिकारी कार्यालय अमरावती
क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- ३४५/२०२१
दिनांक ०५/०४/२०२१

**मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ०४/०४/२०२१ यांचेकडील अधिसूचना**

**०१. कलम १४४ ची अंमलबजावणी व रात्र संचारबंदी**

१. संपूर्ण अमरावती जिल्हयामध्ये सोमवार ते शुक्रवार सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये जमावबंदी लागू राहील या कालावधीत ५ पेक्षा जास्त लोकांनी एकत्र येऊ नये.अनावश्यकरित्या कोणत्याही नागरिकांनी कारणाशिवाय शहरात व गावात शिरु नये वा फिरु नये व त्यांनी त्यांचे घरात वास्तव्य करावे.

२. या व्यतिरिक्त असलेल्या वेळेत (म्हणजेच सोमवार ते शुक्रवार रात्री ८.०० ते सकाळी ७.०० पर्यंत व शुक्रवार रात्री ८.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत संचारबंदी लागू राहील या कालावधीत कोणत्याही नागरिकांनी कारणाशिवाय, विहित परवानगी शिवाय सार्वजनिक ठिकाणी, बाहेर, शहरात व गावात फिरु नये.

३. आठवडा अखेर शुक्रवार रात्री ८.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत पूर्ण संचारबंदी लागू राहील.

४. उपरोक्त नमुद केलेल्या संचारबंदी कालावधी मध्ये वैद्यकीय व इतर अत्यावश्यक सेवा यांना हालचाल करण्यास कुठल्याही निर्बंधाशिवाय परवानगी असेल.

५. **अत्यावश्यक सेवा अंतर्गत खालील सेवांचा समावेश राहील.**

**अ**. सर्व प्रकारची हॉस्पीटल, रुग्णालये, उपचार केंद्रे, क्लिनीक्स, वैद्यकीय विमा कार्यालये, औषधी दुकाने, औषधालये, रुग्णालये, नर्सिंग होम, व वैद्यकीय प्रयोगशाळा, रुग्णवाहिका, तसेच इतर वैद्यकीय व आरोग्य सुविधा सेवा.

**ब**. किराणा, भाजीपाला दुकाने, दुग्ध केंद्र व डेअरी, बेकरी, मिठाई दुकाने व इतर खाद्यगृहे.

**क**. सार्वजनिक वाहतूक सेवा.- उदा. रेल्वे, टॅक्सी, ऑटो, रिक्षा व बस सेवा.

**ड**. स्थानिक प्रशासनाकडून पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी सर्व प्रकारची कामे.

**इ**. स्थानिक प्रशासनाकडून सर्व प्रकारची सार्वजनिक सेवा अंतर्गत असलेली कामे.

**ई**. मालवाहतूक

**फ**. कृषि संबंधी असलेल्या सर्व प्रकारच्या सेवा (बी-बियाणे, रासायनिक खते, कृषि अवजारे दुकाने)

**ग**. ई कॉमर्स सेवा.

**ह**. सर्व मान्यताप्राप्त असलेल्या प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, डिटीएच, केबल सेवा, वृत्तपत्रे सेवा

**०२. बाहय हालचालीबाबत.**

१. सर्व प्रकारच्या सार्वजनिक बाग, बगीचे, उद्याने, सार्वजनिक मैदाने हे रात्री ८.०० ते सकाळी ७.०० पर्यंत आठवडयाचे ७ ही दिवस तसेच शुक्रवार रात्री ८.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत बंद राहतील.

२. आठवडयाचे ७ ही दिवस सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत भेटी देणारे अभ्यंगत यांनी कोविड-१९ च्या अनुषंगाने दिलेले सर्व निर्देश पाळणे बंधनकारक राहील.

३. स्थानिक प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी गर्दी होणार नाही याबाबतची त्यांचे स्तरावरुन दक्षता घेण्यात यावी तसेच गर्दी टाळण्याच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरुन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात.

**०३. दुकाने, बाजारपेठा व मॉल्स बाबत.**

१. अत्यावश्यक सेवेमधील मुददा क्र. १ (५) मध्ये दर्शविण्यात आलेली दुकाने वअत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व प्रकारची दुकाने, बाजारपेठा, मार्केट, मॉल्स हे बंद राहतील.

२. अत्यावश्यक सेवेमधील असलेली दुकाने सुरु ठेवतांना दुकानांच्या परिसरात ग्राहकामध्ये सामाजिक अंतर (Social Distancing) राखल्या जाईल याची दक्षता घेण्यात यावी. क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्यास अशा ग्राहकांना प्रतिक्षा करण्यास रोखून आवश्यक ते सामाजिक अंतर (Social Distancing) ठेवण्यात यावे.

३. अत्यावश्यक सेवा दुकानांचे मालक व त्याकरीता काम करणारे कर्मचारी यांनी शासनाने दिलेल्या निकषानुसार त्यांचे शक्य तितक्या लवकर कोविड लसीकरण करुन घ्यावे. सर्व अत्यावश्यक सेवा दुकानदारांनी ग्राहकांशी संपर्क करतांना पारदर्शक काचाचा अथवा साहित्याचा, चेहरापटटी, शिल्ड व इलेक्ट्रॉनिक भरणा पध्दतीचा (Electronic Payament) चा वापर करावा.

४. ज्या दुकानदारांची दुकाने, बाजारपेठ, मॉल्स, मार्केट बंद राहतील त्या सर्व दुकान धारकांनी/मालकांनी त्यांचे कडे असलेल्या कर्मचारी सह शक्य तितक्या लवकर कोविड लसीकरण तसेच कोविड चाचणी करुन घ्यावे. तसेच ग्राहकांशी संपर्क येत असतांना त्या करीता घ्यावयाच्या खबरदारी नुसार त्यांचे दुकानामध्ये पारदर्शक काचाचा अथवा साहित्याचा, चेहरापटटी, शिल्ड व इलेक्ट्रॉनिक भरणा पध्दतीचा (Electronic Payament) चा वापर करता येईल याबाबत उपाययोजना कराव्या जेणेकरुन शासनाने पुन्हा नव्याने उघडण्याबाबत निर्देश दिल्यास कोणत्याही प्रकारची भिती न बाळगता उघडता येतील.

**०४. सार्वजनिक वाहतूक सेवा**

१. सर्व प्रकारच्या सार्वजनिक वाहतूकीकरीता पुढील प्रमाणे परवानगी राहील. ऑटोरिक्षा करीता चालकांव्यतिरिक्त इतर २ प्रवासी, टॅक्सी (चार चाकी वाहनांकरीता) चालक व प्रादेशिक परिवहन विभागाने निश्चित केलेल्या आसन क्षमतेच्या ५०% प्रवासी, तसेच बस मध्ये प्रादेशिक परिवहन विभागाने निश्चित केलेल्या पूर्ण आसन क्षमतेसह परवानगी राहील तथापी कोणताही प्रवाश्यास उभे राहून प्रवास करण्यास परवानगी राहणार नाही.

२. सर्व प्रकारची सार्वजनिक वाहतूक करतांना प्रत्येक व्यक्तीस प्रवास करतांना मास्क घालणे बंधनकारक राहील तसेच असे न केल्याचे आढळून आल्यास त्यास रु. ५००/- दंडात्मक कार्यवाही करावी.

३. चारचाकी वाहनांमध्ये वाहतूक करतांना जर कुणी व्यक्ती हा मास्क न घातल्याचे आढळून आल्यास त्यास रु. ५००/- दंडात्मक कार्यवाही करावी.

४. प्रत्येक फेरीनंतर सर्व प्रकारची वाहने ही निर्जंतुकीकरण करण्यात यावीत.

५. सर्व प्रकारची सार्वजनिक सेवा अंतर्गत असणाऱ्या वाहनांमधील चालक व इतर कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण होईपर्यंत त्यांनी आपली कोविड तपासणी करुन रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे ज्याची वैधता रिपोर्ट मिळाल्यापासून पुढील १५ दिवसापर्यंत राहील. याबाबतची अंमलबजावणी ही दिनांक १० एप्रील २०२१ पासून करण्यात यावी. जे ऑटो किंवा टॅक्सी चालक हे स्वत:ला प्लास्टीक शिट अथवा शिल्ड लावून अलगीकरण करतील त्यांना या नियमातून सुट राहील.

६. वर दिलेल्या निर्देशानंतरही जर असे कुणी चालक/व्यक्ती ही RT-PCR रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र बाळगणार नाही अथवा कोविड लसीकरण करणार नाही असे आढळून आल्यास त्यास रु. १०००/- ची दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

७. बाहेरील स्टेशन वरुन येणाऱ्या रेल्वे बाबत रेल्वे प्राधिकरणाने कोणीही प्रवासी हा सामान्य डब्यामध्ये प्रवास करतांना उभ्याने प्रवास करणार नाही व प्रवास करतांना मास्क परिधान करेल याची दक्षता घ्यावी. असे न केल्याचे आढळून आल्यास त्यास रु. ५००/- दंडात्मक कार्यवाही करावी.

**०५. कार्यालये बाबत.**

१. खालील नमुद केलेल्या कार्यालयाव्यतिरिक्त इतर सर्व प्रकारची खाजगी कार्यालयेही बंद राहतील.
   अ. सहकार, सार्वजनिक सेवा क्षेत्र, व खाजगी बँका
   ब. विज वितरण सेवा
   क. दुरसंचार सेवा प्रदाते.
   ड. विमा/वैद्यकीय सेवा पूर्ती करणाऱ्या कंपन्या
   इ. वैद्यकीय औषधी निर्माते यांना उत्पादन व वितरणाकरीता आवश्यक असलेले व्यवस्थापन
   फ. कृषि उत्पन्न बाजार समिती, धान्य मार्केट, भाजी मार्केट

२. सर्व प्रकारची शासकीय कार्यालये हे त्यांचकडील असलेल्या एकूण कर्मचारी पैकी ५०% उपस्थिती सह सुरु ठेवता येतील तथापी जी कार्यालये थेट कोरोनाशी संबंधित आहेत अशी कार्यालये ही त्यांचे कार्यालय प्रमुख यांचे निर्णयासह १००% उपस्थिती मध्ये सुरु ठेवता येईल.

३. सर्व प्रकारची शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये जे विज वितरण, पाणी सेवा, बँकीग सेवा व इतर वित्त सेवा संबंधित असतील अशी सर्व कार्यालये ही त्यांचे क्षमतेच्या १००% उपस्थिती सह सुरु ठेवता येतील.

४. सर्व प्रकारच्या शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये अभ्यांगत (Visitors) यांना प्रवेश देण्यात येऊ नये. सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी याबाबत E-Visitor System लवकरात लवकर सुरु करावी.

५. सर्व प्रकारच्या शासकीय कार्यालयामध्ये आवश्यक असेल तर कार्यालय प्रमुख हे त्यांचे परवानगी ने अभ्यंगतांना पास देतील परंतु याबाबत संबंधित अभ्यंगत यांचेकडे त्यांचा RT-PCR रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

६. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व प्रकारच्या खाजगी व शासकीय कार्यालयामधील कर्मचारी यांनी शक्य तितक्या

लवकर कोविड लसीकरण करुन घेण्यात यावे. जेणे करुन शासनाने पुन्हा नव्याने उघडण्याबाबत निर्देश दिल्यास कोणत्याही प्रकारची भिती न बाळगता कार्यालये सुरु करता येतील.

**०६. खाजगी वाहतूक सेवा**

१. सर्व प्रकारच्या खाजगी वाहतूक सेवा, खाजगी बसेस सह हया सोमवार ते शुक्रवार सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत सुरु ठेवता येतील तथापी आपत्कालीन परिस्थितीत व रुग्णांच्या सेवेसाठी या व्यतिरिक्त कालावधीत म्हणजेच रात्री ८.०० ते सकाळी ७.०० पर्यंत व शुक्रवार रात्री ८.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत वाहतूक करण्यास परवानगी राहील.

२. खाजगी बसेस ची वाहतूक करतांना त्यांचे एकूण असलेल्या आसन क्षमतेनुसार प्रवासी यांना बसुन प्रवास करण्यास परवानगी राहील. कोणत्याही प्रवाश्यास उभे राहून प्रवास करण्यास परवानगी राहणार नाही.

३. खाजगी बसेस ची वाहतूक करणाऱ्या वाहनांमधील चालक व इतर कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण होईपर्यंत त्यांनी आपली कोविड तपासणी करुन रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे ज्याची वैधता रिपोर्ट मिळाल्यापासून पुढील १५ दिवसापर्यंत राहील. याबाबतची अंमलबजावणी ही दिनांक १० एप्रील २०२१ पासून करण्यात यावी.

**०७. करमणूक व मनोरंजनाबाबत.**

१. सर्व प्रकारची सिनेमागृहे/चित्रपटगृहे बंद राहतील.

२. सर्व प्रकारची नाटयगृहे व प्रेक्षकगृहे हे बंद राहतील.

३. सर्व प्रकारचे मनोजरंजन पार्क, आर्केडस, व्हिडीओ गेम पार्लर हे बंद राहतील.

४. सर्व प्रकारचे वाटर पार्क बंद राहतील.

५. सर्व प्रकारचे क्लब, जलतरण तलाव, जिम/व्यायामशाळा, क्रिडा संकुले ही बंद राहतील.

६. या आस्थापना संबंधी असलेल्या सर्व प्रकारच्या संबंधित यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. जेणे करुन शासनाने पुन्हा नव्याने उघडण्याबाबत निर्देश दिल्यास कोणत्याही प्रकारची भिती न बाळगता उपरोक्त नमूद बाबी सुरु करता येतील.

**०८. रेस्टॉरेंट, बार, लॉज, हॉटेल्स, खाद्यगृहे**

१. सर्व प्रकारची रेस्टॉरेंट, हॉटेल्स, खाद्यगृहे व बार हे त्यांचे परिसरात राहणारे व्यक्ती यांच्या व्यतिरिक्त इतर सर्वांसाठी बंद राहतील

२. तथापी अशा हॉटेल्स, रेस्टॉरेंट, खाद्यगृहे यांना पार्सल व घरपोच सेवा देण्याकरीता सोमवार सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत परवानगी असेल. शुक्रवार रात्री ८.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत केवळ घरपोच सेवा देता येईल कोणत्याही प्रकारे ग्राहकाला हॉटेल्स, रेस्टॉरेंट, खाद्यगृहे येथे येऊन ऑर्डर देण्याची अथवा पार्सल घेण्याची परवानगी असणार नाही.

३. ज्या हॉटेल्स, रेस्टॉरेंट खाद्यगृहे व बार मध्ये अतिथी असतील अशा करीता हॉटेल्स रेस्टारेंट व बार सुरु ठेवता येतील. बाहेरील कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारे हॉटेल्स, रेस्टॉरेंट व बार मध्ये परवानगी असणार नाही. त्या सर्वांकरीता उपरोक्त नमुद करण्यात आल्याप्रमाणे निर्बंध कायम राहतील.

४. घर पोच सेवा देणारे कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे.जर असे कोविड लसीकरण झाले नसेल तर त्यांना त्यांचा कोविड तपासणी अहवाल निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत बाळगणे आवश्यक राहील ज्याची वैधता रिपोर्ट आल्यापासून पुढील १५ दिवस राहील.

५. जे हॉटेल्स, रेस्टॉरेंट, लॉज, खाद्यगृहे व बार हे उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे आदेशाचे पालन करणार नाही व कोविड तपासणी अहवाल निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत बाळगणार नाही अशा व्यक्तीस रु. १०००/- व संबंधित आस्थापना (रेस्टॉरेंट, हॉटेल्स, खाद्यगृहे व बार) यांना रु.१०,०००/- दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. पुन्हा असा गुन्हा केल्याचे आढळून आल्यास कोविड-१९ च्या अनुषंगाने पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत त्यांचा परवाना रदद करण्यात यावा.

६. सर्व हॉटेल्स, रेस्टॉरेंट खाद्यगृहे व बार मध्ये काम करणारे कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. जेणे करुन शासनाने पुन्हा नव्याने उघडण्याबाबत निर्देश दिल्यास कोणत्याही प्रकारची भिती न बाळगता उपरोक्त नमूद बाबी सुरु करता येतील.

**०९. धार्मिक स्थळी पुजा अर्चना करण्याबाबत.**

१. सर्व प्रकारची धार्मिक स्थळे/प्रार्थना स्थळे ही बंद राहतील.

२. अशा धार्मिक स्थळी कार्यरत असणाऱ्या सर्व प्रकारच्या कर्मचारी/ व्यक्ती हयांना त्यांची नियमित कामे करण्यास अनुपती असेल तथापी बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीस अशा धार्मिक/प्रार्थना स्थळी येण्याकरीता मनाई राहील.

३. अशा धार्मिक स्थळी काम करणारे सर्व कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. जेणे करुन शासनाने पुन्हा नव्याने उघडण्याबाबत निर्देश दिल्यास कोणत्याही प्रकारची भिती न बाळगता अशी धार्मिक स्थळे पुन्हा सुरु करता येतील.

**१०. कटिंगची दुकाने/स्पा/सलुन/ब्यूटी पार्लरर्स बाबत**

१. सर्व प्रकारची कटिंगची दुकाने
२. सर्व प्रकारची कटिंगची दुकाने, सलुन, स्पा, ब्यूटी पार्लर बंद राहतील.
४. अशा ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. जेणे करुन शासनाने पुन्हा नव्याने उघडण्याबाबत निर्देश दिल्यास पुन्हा सुरु करता येतील.

**११. वृत्तपत्रे**

१. सर्व प्रकारची वृत्तपत्रे यांना छपाई व वितरणाची परवानगी असेल.
२. सकाळी ७.०० ते रात्री ८.०० या वेळेमध्ये वृत्तपत्रे यांना घरपोच सेवा देण्याकरीता परवानगी अनुज्ञेय राहील.
३. सर्व प्रकारची वृत्तपत्रासंबंधी कामे करणारे कर्मचारी/कामगार/व्यक्ती यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण होईपर्यंत त्यांनी आपली कोविड तपासणी करुन रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे ज्याची वैधता रिपोर्ट मिळाल्यापासून पुढील १५ दिवसापर्यंत राहील. याबाबतची अंमलबजावणी ही दिनांक १० एप्रील २०२१ पासून करण्यात यावी.

**१२. शाळा व महाविद्यालये**

१. सर्व प्रकारचे शाळा व महाविद्यालये ही बंद राहतील.
२. वर्ग १० व वर्ग १२ च्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्याकरीता या नियम शिथिल राहील. परीक्षा करीता नियुक्त करण्यात येणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी कोविड तपासणी अथवा त्यांची RT-PCR चाचणी ही निगेटिव्ह असल्याबाबतचा अहवाल ज्याची वैधता ४८ तास राहील सोबत ठेवणे आवश्यक राहील.
३. महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील मंडळ (Board), विद्यापीठ अथवा संस्था यांचेकडील असणाऱ्या परीक्षेस बसण्याकरीता विद्यार्थ्यांस संबंधित विभाग यांनी याबाबत स्थानिक आपत्ती व्यवस्थापनास सूचित करुन त्यानुसार परवानगी प्रदान करावी.
४. सर्व प्रकारचे खाजगी कोचिंग क्लासेस, शिकवणी वर्ग, शैक्षणिक प्रशिक्षण केंद्रे ही बंद राहतील.
५. अशा प्रकारच्या आस्थापना संबंधी काम करणाऱ्या कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. जेणे करुन शासनाने पुन्हा नव्याने उघडण्याबाबत निर्देश दिल्यास पुन:श्च सुरुवात करता येईल.

**१३. धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रमांबाबत.**

१. कोणत्याही प्रकारच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांस परवानगी अनुज्ञेय राहणार नाही.
२. संदर्भिय क्र. ७ अन्वये लग्न व इतर समारंभाबाबत पारीत करण्यात आलेले आदेश हे सुध्दा पुढील आदेशापर्यंत लागू राहतील सदर आदेशानुसार लग्न समारंभाकरीता ५० लोकांना (वर वधु/ऑर्केस्ट्रॉ/कॅटरर्स/बॅंड पथक सह) उपस्थित राहता येईल तसेच सदरची परवानगी ही फक्त वर किंवा वधू यांचे घर अथवा खुले लॉन, विना वातानुकुलीतमंगल कार्यालये/हॉल/सभागृहे येथे लग्न समारंभ आयोजित करण्याकरीता राहील लग्न समारंभ आयोजित करतांना त्याकरीता वेळ ही सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंतच राहील. लग्न समारंभाच्या ठिकाणी सदर बाबींचे पालन न झाल्यास आयोजकास रक्कम रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार रु. फक्त) दंड आकारण्यात येईल आणि वर/वधु व आयोजक यांचेवर गुन्हा दाखल करण्यात येईल. लग्न समारंभाकरीता एकंदर उपस्थिती ही ५० पेक्षा जास्त असणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच याबाबत संदर्भिय क्र. ७ च्या आदेशामधील दिलेल्या सूचना व आदेश हे पुढील आदेशापर्यंत कायम राहतील.
३. अंत्यविधी करीता केवळी २० लोकांना उपस्थित राहण्याची परवानगी राहील. तसेच अंत्यविधीकरीता उपस्थित असणाऱ्या सर्वांनी कोविड लसीकरण करुन घ्यावे अथवा त्यांचा कोविड चा रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबत प्रमाणपत्र सोबत ठेवावे.

**१४. रस्त्याच्या कडेला असलेले खाद्यपदार्थ विक्रेतेबाबत.**

१. रस्त्याच्या कडेला उभे राहून कोणत्याही प्रकारे कुठलेही खाद्यपदार्थ ची सेवा ग्राहकांना देता येणार नाही. पार्सल सेवा अथवा घरपोच सेवा ही रोज सकाळी ७.०० ते रात्री ८.०० या वेळेत देता येईल.
२. प्रतिक्षेत असणाऱ्या ग्राहकांना दुकानाच्या काउंटरशेजारी सामाजिक अंतर (Social Distancing) राखुन प्रतिक्षा करण्यास सांगावे.
३. याबाबतील संबंधित विक्रेते यांनी उल्लंघन केल्यास कोविड संपेपर्यंत त्यांचे विक्री बंद करण्यात येईल.

४. याबाबत सर्व फेरीवाले, विक्रेते यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण होईपर्यंत त्यांनी आपली कोविड तपासणी करुन रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे ज्याची वैधता रिपोर्ट मिळाल्यापासून पुढील १५ दिवसापर्यंत राहील. याबाबतची अंमलबजावणी ही दिनांक १० एप्रील २०२१ पासून करण्यात यावी.

४. स्थानिक प्रशासनाने याबाबत आवश्यक असलेल्या पुरेशा ठिकाणावर सिसिटीव्ही लावून याबाबत नियंत्रण ठेवावे. कोणताही ग्राहक अथवा विक्रेते हे याबाबत उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

५. दंडात्मक कार्यवाही केल्यानंतरही संबंधिताकडून उल्लंघन होत असल्याचे स्थानिक प्रशासनास आढळून आल्यास याबाबत संबंधित विक्रेते यांचे दुकान हे तात्पुरते अथवा कोविड संपेपर्यंत कायम स्वरुपी बंद करावे.

**१५. निर्मिती व उत्पादन क्षेत्राबाबत.**

१. निर्मिती व उत्पादन क्षेत्रे ही अटी व शर्ती सह सुरु ठेवता येतील.

२. सर्व प्रकारचे कारखाने, उद्योग हे त्यांचे कर्मचारी यांचे कामगार/कर्मचारी यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांचे शारिरिक तापमानाची मोजणी करतील.

३. सर्व प्रकारच्या निर्मिती व उत्पादन क्षेत्रासंबंधी असलेल्या कर्मचारी व कामगार यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे.

४. काम करत असतांना कुठलाही मजुर/कामगार/कर्मचारी हा कोविड तपासणी मध्ये पॉजीटिव्ह आढळून आल्यास त्याच्या संपर्कात आलेल्या इतर कामगार/मजुर यांना विलगीकरणात वेतनासह ठेवण्यात यावे.

५. ज्या कारखान्यांमध्ये/निर्मिती उद्योगांमध्ये ५०० पेक्षा जास्त कामगार/कर्मचारी आहेत अश्या सर्व उद्योगांनी त्यांचे स्वत:चे विलगीकरण कक्ष स्थापन करावे.

६. जर एखादा कर्मचारी/कामगार हा कोविड पॉजीटिव्ह आढळून आल्यास निर्जंतुकीकरण होईपर्यंत त्याचे युनिट हे पूर्णत: बंद ठेवण्यात यावे.

७. जेवणाच्या व चहाच्या वेळामध्ये अंतर ठेवण्यात यावे जेणे करुन एकाच वेळी कर्मचारी/कामगार हे एकत्र येऊन त्यांची गर्दी होणार नाही.

८. सार्वजनिक प्रसाधन गृहे ही वारंवार निर्जंतुकीकरण करण्यात यावी.

९. सर्व कर्मचारी/कामगार यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण होईपर्यंत त्यांनी आपली कोविड तपासणी करुन रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे ज्याची वैधता रिपोर्ट मिळाल्यापासून पुढील १५ दिवसापर्यंत राहील. याबाबतची अंमलबजावणी ही दिनांक १० एप्रील २०२१ पासून करण्यात यावी.

१०. एखादा कर्मचारी/कामगार हा कोविड रुग्ण असल्याचे आढळून आल्यास त्यास वैद्यकीय रजा प्रदान करावी व सेवेतून त्याला या कालावधीत कमी करण्यात येऊ नये. तसेच या कालावधीत त्याला पूर्णत: वेतन देण्यात यावे.

**१६. ऑक्सीजन उत्पादने**

१. कोणत्याही औद्योगिक प्रक्रियेस कच्चा माल म्हणून ऑक्सीजन चा पुरवठा करण्यास दिनांक १० एप्रील २०२१ पासून मनाई करण्यात येत आहे. अशा कुठल्याही उद्योगास ऑक्सीजनची आवश्यक ता असल्याबाबत त्यांनी सक्षम परवाना प्राधिकारी यांचेकडे सक्षम कारणांसह परवानगी घ्यावी.

२. ऑक्सीजन सिलेंडर ची निर्मिती करणाऱ्या सर्व औद्योगिक आस्थापना हयांनी त्यांच्या क्षमतेच्या ८०% साठा हा वैद्यकीय कारणांसाठी आरक्षीत ठेवावा तसेच दिनांक १० एप्रील २०२१ पासून त्यांनी त्यांचे पुरवठादार व ग्राहक यांना याबाबत सूचित करावे.

**१७. ई कॉमर्स**

१. ई कॉमर्स क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी शासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण होईपर्यंत त्यांनी आपली कोविड तपासणी करुन रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे ज्याची वैधता रिपोर्ट मिळाल्यापासून पुढील १५ दिवसापर्यंत राहील. याबाबतची अंमलबजावणी ही दिनांक १० एप्रील २०२१ पासून करण्यात यावी.

**१८. सहकारी गृहनिर्माण संस्था बाबत.**

१. कोणत्याही प्रकारच्या सहकारी गृह निर्माण संस्था मध्ये ५ पेक्षा जास्त व्यक्ती हया कोरोना रुग्ण असल्याचे आढळून आल्यास अशा सोसायटीस/गृह निर्माण संस्थेस मायक्रो कंटेन्टमेंट झोन (Micro Containment Zone) म्हणून घोषित करण्यात येईल.

२. अशा सोसायटी/गृह निर्माण संस्थेच्या बाहेर कोविड रुग्ण असल्याचा फलक लावण्यात यावा व बाहेरील व्यक्तीस प्रवेश निषिध्द करण्यात यावा.
३. अशा सोसायटी/गृह निर्माण संस्थेच्या आत प्रवेश व बाहेर जाण्यास मज्जाव करण्याबाबत संबंधित सोसायटीने नियंत्रण ठेवावे.
४. याबाबत कोणत्याही सोसायटीने उल्लंघन केल्याचे प्रथम दर्शनी आढळून आल्यास स्थानिक प्राधिकरणाने रु. १०,०००/- दंडात्मक कार्यवाही करावी तथापी तदनंतरही उल्लंघन केल्याचेआढळून आल्यास अधिकच्या दंडाची कार्यवाही करण्यात यावी.
५. सर्व प्रकारच्या सहकारी गृह निर्माण संस्था यांनी त्यांचे इमारतीत येणाऱ्या व्यक्ती हया त्यांचे कोविड लसीकरण होईपर्यंत त्यांची RT-PCR चाचणी नियमिपणे करतात याची खबरदारी घ्यावी

**१९. बांधकाम प्रक्रिया**

१. ज्या ठिकाणी मजुर/कामगार यांचे राहण्याची सुविधा आहे अशा सर्व ठिकाणची बांधकामे यांना परवानगी अनुज्ञेय राहील. बाहेरील ठिकाणाहून मजुर/कामगार यांना बांधकाम साहित्य आणण्याखेरीज इतर हालचाल करण्यास मनाई राहील.
२. बांधकाम संबंधी असलेल्या मजुर/कामगार यांनाशासन निर्देशानुसार शक्य तितक्या लवकर त्यांचे कोविड लसीकरण करुन घ्यावे. लसीकरण होईपर्यंत त्यांनी आपली कोविड तपासणी करुन रिपोर्ट निगेटिव्ह असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे ज्याची वैधता रिपोर्ट मिळाल्यापासून पुढील १५ दिवसापर्यंत राहील. याबाबतची अंमलबजावणी ही दिनांक १० एप्रील २०२१ पासून करण्यात यावी.
३. उपरोक्त दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास संबंधित बांधकाम विकासक यांना रु. १०,०००/- दंडात्मक कार्यवाही करावी. पुन:श्च असे घडल्याचे आढळून आल्यास अशा जागेवरील बांधकाम बंद करण्यात यावे.
४. बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचारी/कामगार/मजुर हा कोविड रुग्ण म्हणून आढळून आल्यास त्यास वैद्यकीय रजा प्रदान करावी व सेवेतून त्याला या कालावधीत कमी करण्यात येऊ नये. तसेच या कालावधीत त्याला पूर्णत: वेतन देण्यात यावे.

**२० दंडात्मक कारवाई**

१. यापूर्वी संदर्भिय क्र. ५ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील सर्व दंडात्मक तरतुदी हया लागू राहतील
२. तसेच उपरोक्त दिलेल्या निर्देशातील दंडात्मक तरतुदींची रक्कम ही संबंधित आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडे जमा करण्यात यावा जेणे करुन आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत कोविड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता उपयोग करता येईल.
३. सदरचे आदेश हे दिनांक ०५ एप्रील २०२१ चे रात्री ८.०० पासून ते दिनांक ३० एप्रील २०२१ चे ११.५९ वा. पर्यंत लागू राहतील.